**आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या कार्यालयातील व ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयातील एकूण २८८ अस्थायी पदांना दिनांक ०१ मार्च, २०१८ ते ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत....**

# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

**शासन निर्णय क्र. : अस्थाप-२०१८/प्र.क्र.६/का-७,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक: २६ मार्च, २०१८.**

**वाचा :-**

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१ सप्टेंबर,२०१६,

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: पदनि-२०१६/प्र.क्र.१६/आपुक, दिनांक ०५ मार्च, २०१८,

३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक: अस्थाप-२०१८/प्र.क्र.१६/का-७, दिनांक १८ जानेवारी, २०१८,

**प्रस्तावना:-**

आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे कार्यालयातील व ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयातील एकूण २८८ अस्थायी पदांना संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये दिनांक ०१ जानेवारी, २०१८ ते २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदत संपल्याने वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे कार्यालयातील व ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयातील एकूण २८८ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे कार्यालयातील व ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयातील खालील कोष्टकात नमूद केलेल्या एकूण २८८ अस्थायी पदांना दिनांक ०१ मार्च, २०१८ ते ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **वेतन संरचना** | **पदांच्या आढाव्यानंतर सुधारित आकृतीबंध नुसार मंजूर पदांपैकी अस्थायी पदे** |
|---|---|---|---|
| १. | सहसंचालक/सहआयुक्त | १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ७६०० | ९ |
| २. | उपसंचालक (सं) | १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ६६०० | ७ |
| ३. | विधी अधिकारी | १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ६६०० | ८ |
| ४. | वरिष्ठ संशोधन अधिकारी (वर्ग-१) | १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ५४०० | १६ |
| ५. | पोलीस उप अधिक्षक | १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ५४०० | ८ |
| ६. | पोलीस निरीक्षक | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ५००० | ३८ |
| ७. | संशोधन अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४४०० | २३ |
| ८. | प्रबंधक (रजिस्टार) | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४४०० | ८ |
| ९. | संशोधन सहायक | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४३०० | १४ |
| १०. | कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४३०० | ८ |
| ११. | निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी) | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४३०० | ६ |
| १२. | निम्नश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४३०० | १८ |
| १३. | सांख्यिकी सहायक | ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४२०० | १ |
| १४. | लघुटंकलेखक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. २४०० | ८ |
| १५. | अन्वेषक (क) | ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. १९०० | १ |
| १६. | लिपिक-टंकलेखक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. १९०० | ५० |
| १७. | पोलीस शिपाई | ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. १९०० | ३८ |
| १८. | वाहन चालक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. १९०० | ५ |
| १९. | अभिलेखपाल (रेकॉर्ड किपर) | ५२००-२०२०० ग्रेड वेतन रु. १९०० | ८ |
| २०. | शिपाई | ४४००-७४४० ग्रेड वेतन रु. १३०० | १४ |
| | | **एकूण** | **२८८** |

२. सदर २८८ अस्थायी पदांवरील वेतनादी भत्याचा खर्च खालील कोष्टकात नमूद करण्यात आलेल्या संबंधित लेखाशिर्षाखाली खर्च करण्यात यावा आणि तो मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

| **अ.क्र.** | **सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात ज्या लेखाशिर्षाखाली खर्च करावयाचा आहे तो लेखाशिर्ष** |
|---|---|
| १. | मागणी क्रमांक टी, ५-<br>२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना-०२-अनुसूचित जमातीचे कल्याण- राज्य योजनांतर्गत योजना -००१-संचालन व प्रशासन (०१) (०१) नियोजन व संनियंत्रण शाखा- जनजाती संशोधन व प्रशिक्षण संस्था (२२२५-४१२२) |

| **अ.क्र.** | **सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात ज्या लेखाशिर्षाखाली खर्च करावयाचा आहे तो लेखाशिर्ष** |
|---|---|
| २. | मागणी क्रमांक टी, २-<br>२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-२७७-शिक्षण-०५ संशोधन व प्रशिक्षण (१) (ए) जनजाती संशोधन व प्रशिक्षण संस्था (२२२५-१३०१) |
| ३. | मागणी क्रमांक टी, २-<br>२२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण व ०२-अनुसूचित जमातीचे कल्याण -००१ संचालन व प्रशासन (०४) एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम (२२२५ १०५२) |

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०५ मार्च, २०१८ अन्वये प्रशासकीय विभागाना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१८०३२६१२०२४०७६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Yogesh A Sawant

Digitally signed by Yogesh A Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7cefaf50ac0e3c1b6570c758525237ee6d89f57ad6f8775d3c4a59d92d913372, cn=Yogesh A Sawant
Date: 2018.03.26 12:05:54 +05'30'

**( योगेश अ.सावंत )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
२) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), (महाराष्ट्र -१) महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), (महाराष्ट्र -२) महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) महालेखापाल (लेखापरिक्षा), (महाराष्ट्र -१) महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) महालेखापाल (लेखापरिक्षा), (महाराष्ट्र -२) महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) सर्व सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१०) अवर सचिव (का.६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११) अवर सचिव (का.१५), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२) वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई
१३) निवड नस्ती (का.७)